**<u>ठळक बातम्या</u>**

- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीमधे राष्ट्रवादी काँग्रेस ८५ ते ९० जागा मागणार, तर योग्य जागा दिल्या नाहीत तर ३० जागांवर निवडणूक लढवण्याची पीपल्स रिपब्लिकन पक्षाची भूमिका
- वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघात वापरल्या गेलल्या मोबाईलचा मतमोजणीशी संबंध नसल्याचं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचं स्पष्टिकरण
- एसटी महामंडळ मंगळवारपासून 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' मोहीम राबवणार

**आणि**

- महिला क्रिकेटमधे बंगळुरु इथं सुरु असलेल्या एकदिवसीय सामन्यात भारताचं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी २६६ धावांचं आव्हान /स्मृती मंधानाचं शतक

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत ८५ ते ९० जागा लढवण्याचा इरादा राष्ट्रवादी काँग्रेसनं व्यक्त केला आहे. महायुतीमधे तेवढ्या जागा पक्ष मागणार असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल पटेल यांनी आज गोंदिया इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. लोकसभा निवडणुकीत NDA ला अपेक्षित यश मिळालं नसलं तरी विधानसभा निवडणुकीत चित्र बदलेल असं ते म्हणाले.

राज्यात लवकरच महाराष्ट्रात मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याचं पटेल यांनी सांगितलं. केंद्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला मंत्रीपद आलं तर ते मलाच मिळेल, असं ते म्हणाले.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीत महायुतीनं योग्य जागा दिल्या नाहीत तर आपण राज्यात ३० जागांवर निवडणूक लढणार असल्याचं पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष जोगेंद्र कवाडे यांनी स्पष्ट केलं आहे. ते ठाण्यात बातमीदाराशी बोलत होते. राज्य मंत्रिमंडळात एक कॅबिनेट, एक राज्यमंत्री आणि एका महामंडळात पक्षाला प्रतिनिधित्व द्यावं, अशी मागणीही कवाडे यांनी केली आहे. केंद्रातल्या रालोआ सरकारनं कष्टकरी, शेतकऱ्यांसाठी काम करावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

ईव्हीएम, अर्थात ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र अनलॉक करण्यासाठी ओटीपीची गरज लागत नाही, ते कशाशीही जोडलेलं नसतं, असं वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी स्पष्ट केलं आहे. या मतदारसंघातल्या मतमोजणीवेळी ईव्हीएम अनलॉक करण्यासाठी लागणारा मोबाईल शिवसेनेचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्या नातलगाकडे असल्याची चर्चा सुरू होती, त्या पार्श्वभूमीवर त्या आज वार्ताहर परिषदेत बोलत होत्या.

जो मोबाईल वापरला गेला तो  इनकोर सिस्टीमशी निगडीत होता. त्याचा मतमोजणीशी संबंध नसून डेटा एन्ट्रीशी संबंध असल्याचं सूर्यवंशी यांनी सांगितलं. या मोबाईलच्या वापराप्रकरणी एफआयआर दाखल केला असून तपास सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

१८व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज दुसरा दिवस आहे. यंदा पहिल्यांदाच आयोजित केलेल्या डॉक फिल्म बझारचं उद्घाटन आज झालं. याबद्दलचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून.

**व्हाईस कास्ट (४६ सेकंद)**

*दिल्ली क्राइम या गाजलेल्या वेबसीरीजच्या निर्मात्या आणि एमी पुरस्कार विजेत्या अपूर्वा बक्षी यांनी नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या प्रांगणात मिफच्या डॉक फिल्म बझार या माहितीपट प्रदर्शनाचं उद्घाटन केलं. महोत्सवाचे संचालक पृथुल कुमार आणि पत्रसूचना कार्यालयाच्या अतिरिक्त महासंचालक स्मिता वत्स-शर्मा यावेळी उपस्थित होत्या. नवोदित माहितीपट निर्मात्यांना आपलं काम वरिष्ठ निर्मात्यांना दाखवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या डॉक फिल्म बझारचा उद्देश आहे. मिफमध्ये आज विविध माहितीपट, लघुपट, ॲनिमेशनपट दाखवण्यात येत आहेत. तसंच चित्रपटांशी संबंधित विविध विषयांवरची मार्गदर्शनपर सत्रं, चर्चासत्रंही नॅशनल सेंटर फॉर पर्फोर्मिंग आर्ट्स इथं होत आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी, अंकिता आपटे, मुंबई.*

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमाच्या १११व्या भागात येत्या ३० तारखेला देशवासियांशी संवाद साधणार आहेत. सलग तिसऱ्यांदा प्रधानमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मोदी यांचा ‘मन की बात’चा हा पहिलाच कार्यक्रम आहे.

या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपले विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर तसंच नरेंद्र मोदी ॲप किंवा मायगव्ह खुल्या मंचावर येत्या २८ जूनपर्यंत कळवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यात उद्या बकरी ईदचा सण साजरा होणार असून त्या पार्श्वभूमीवर प्रशासनानं तयारी केली आहे. कुर्बानीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली असून पशूंच्या तपासणीसाठी पशुसंवर्धन विभागानं विशेष  व्यवस्था केली आहे.

राज्यपाल रमेश बैस यांनी ईद अल - अझ्हा म्हणजेच बकरी ईद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

ईद  अल - अझ्हा हा सण त्याग, करुणा आणि परोपकाराचा संदेश देतो. या सणा निमित्त उदात्त मूल्यांच्या जपणुकीसाठी प्रयत्न करण्याचा संकल्प करण्याचं आवाहन राज्यपालांनी  संदेशात केलं आहे.

**<><><><><>**

एसटी महामंडळाकडून ‘एसटी पास थेट तुमच्या शाळेत’ ही मोहीम १८ जूनपासून राबवली जाणार आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना एसटी बसचे पास आता थेट शाळेत मिळणार आहेत. एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकिय संचालक माधव कुसेकर यांनी यासंदर्भात स्थानिक एसटी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. तसंच शाळा, महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवायला सांगण्यात आलं आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे बंगळुरु इथं सुरु असलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी २६६ धावांचं आव्हान ठेवलं आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना स्मृती मंधानाच्या शतकी खेळीच्या जोरावर निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून २६५ धावा केल्या. स्मृतीनं ११७ धावा करताना आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांमधे ७ हजार धावांचा टप्पा ओलांडला. दिप्ती शर्मानं ३७, तर पूजा वस्त्राकारनं नाबाद ३१ धावांचं योगदान दिलं. दक्षिण आफ्रिकेतर्फे आयाबोंगा खाका हीनं ३, तर सबता कलसनं २ बळी मिळवले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या २२ षटकात ४ बाद ७२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज ऑस्ट्रेलियानं स्कॉटलंडवर पाच गडी राखून विजय मिळवला. पहिल्यांदा फलंदाजी करताना स्कॉटलंडनं वीस षटकात पाच गड्याच्या मोबदल्यात १८० धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियानं आपले पाच गडी गमावले. मात्र शेवटच्या षटकातले दोन चेंडू शिल्लक असताना १८६ धावा करत सामना जिंकला.

**<><><><><>**

राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्षाकडून जानेवारी ते मे या कालावधीत १७ कोटी ६९ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी ही माहिती दिली. निर्धन आणि दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत उपचार मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधी आणि न्याय

विभागाअंतर्गत जानेवारी २०२४ मध्ये हा कक्ष सुरू केला. राज्यभरातली धर्मादाय रुग्णालय या उपक्रमात सहभागी झाली आहेत. निर्बल आणि दुर्बल घटकातील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयात १० टक्के खाटा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. खासगी विश्वस्त संस्थांनीही या उपक्रमाला हातभार लावला आहे. गंभीर आजार असलेल्या २५८ रुग्णांच्या यशस्वी शस्त्रक्रिया या कक्षाच्या माध्यमातून करण्यात आल्या.

**<><><><><>**

कलिना भूखंड गैरव्यवहार प्रकरणी येत्या २८ तारखेला होणाऱ्या सुनावणीला हजर राहण्याचे स्पष्ट आदेश मुंबईतल्या सत्र न्यायालयानं राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांना दिले आहेत. सुनावणीला गैरहजर राहिले तर वॉरंट बजावण्याचा इशाराही न्यायालयानं दिला आहे.

मुंबईत कलिना इथं राज्य मध्यवर्ती ग्रंथालय उभारणीच्या कंत्राटामध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं भुजबळ यांच्यासह सहा जणांवर आरोपपत्र दाखल केलं आहे. या प्रकरणी सुनावणी पुढं ढकलण्यासाठी भुजबळ यांनी अर्ज दाखल केला होता. मात्र, तुम्ही अनेकदा तारखांना गैरहजर राहिला आहात, असं सांगत न्यायालयानं हा अर्ज फेटाळून लावला.

**<><><><><>**

कापूस, सोयाबीन आणि इतर तेलबिया पिकांच्या मूल्यसाखळीला चालना देण्यासाठी राज्य सरकार विशेष कृती योजना राबवत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडिबीटी पोर्टलच्या mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करण्याचं आवाहन कृषी विभागाने केलं आहे. चालु वर्षातल्या

खरीप हंगामासाठी नॅनो युरिया सोयाबीन, नॅनो डीएपी सोयाबीन, नॅनो युरिया कापूस, नॅनो डीएपी कापूस या निविष्ठांसाठी ३० जूनपर्यंत अर्ज करता येणार आहेत. तर मेटाल्डीहाईड सोयाबीनसाठी २३ जूनपर्यंत अर्ज करण्याचं आवाहन कृषी विभागाने केलं आहे. या अर्जातून लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

पंढरपूर इथं आज सोलापूर जिल्ह्यातल्या धनगर समाजाची बैठक झाली. धनगर समाजातल्या तरुणांना तीस लाख बिनव्याजी कर्ज मिळावं, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर भवनासाठी पंढरपुरात जागा उपलब्ध करून द्यावी, अहिल्यादेवी आर्थिक विकास महामंडळाला येत्या अधिवेशनात निधी वर्ग करावा, आदी मागण्या राज्य सरकारकडे करण्याचा ठराव या बैठकीत करण्यात आला.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस पुढच्या चार पाच दिवसात राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे.

गेल्या चोवीस तासात कोकणात बऱ्याच ठिकाणी, तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात अनेक ठिकाणी, तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.